दाखल तारीख :– १२/०५/२०१४
नोंदणी तारीख :– १२/०५/२०१४
निकाल तारीख :– २१/०९/२०१८
कालावधी :– वर्षे महिने दिवस
०४ ०४ ०९

**न्यादंडाधिकारी वर्ग–१ कराड यांचे न्यायालयात**
**(पीठासीन अधिकारी ए.जे.पाटील)**

**नियमित फौजदारी खटला क्र.१८०/२०१४.**
**CNR NO. MHST07-001170-2014**
**निशाणी क्र. .**

महाराष्ट्र सरकार तर्फे }
कराड शहर पोलीस ठाणे, गु.र.नं. ४४९/२०१३ } ... फिर्यादी.
तालुका :– कराड, जिल्हा :– सातारा. }

विरुध्द

१) दिपक जगदीश शेटे }
वय :– ३२ वर्षे, धंदा :– शेती, }
रा. शिवणी, ता. कडेगाव, जि. सांगली. }
२) गगणदिपसिंग उमेदसिंग दलावरी (फरारी) } ... आरोपी.
वय :– ३२ वर्षे, }
राहणार :– मैत्रीपार्क वाखानरोड लगत कराड }
ता.कराड, जि. सातारा }

सरकार/फिर्यादीतर्फे वकील :– श्री.एन.व्ही. कानिटकर.
आरोपीतर्फे वकील :– सौ. एम. आर. शहा

**न्यायनिर्णय**

(घोषीत केल्याचा दिनांक २१/०९/२०१८)

०१. प्रस्तुत खटला आरोपी क्र. १ विरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० (संक्षिप्तमध्ये

भा.दं.सं.) चे कलम ३८० नुसार चालविण्यात आला.

०२. अभियोग पक्षाचे कथन असे आहे की, फिर्यादी नामे संदीप जगन्नाथ थोरात व त्याचा मित्र सत्यप्रकाश गेलहोत यांचे यशवंत हायस्कुल शेजारी साईलक्ष्मी प्लाझा इमारतीमध्ये महालक्ष्मी नावाचे मोबाईलचे दुकान आहे. दि. २४/१२/२०१३ रोजी फिर्यादीने त्याचा सॅमसंग मोबाईल एस–८५० हा ठेवला होता. दि. २८/१२/२०१३ रोजी सायंकाळी ६.३० वाजणेच्या सुमारास तो मोबाईल नसलेचे लक्षात आले. फिर्यादीने दुकानातील सी.सी. टी.व्ही. कॅमेरातुन पाहिले असता तो मोबाईल दि. २४/१२/२०१३ रोजी अज्ञात इसमाने चोरुन नेलेचे दिसुन आले. फिर्यादीने कराड शहर पोलीस स्टेशन येथे अज्ञात व्यक्तिविरुध्द फिर्याद दिली. त्यावरुन कराड शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ४४९/२०१३ दाखल करण्यात आला.

०३. सहाय्यक पोलीस फौजदार श्री. आर.के.पटेल यांनी गुन्हयाचा तपास केला. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. संशयावरुन आरोपींना ताब्यात घेतले. त्यावेळी आरोपी क्र. २ ने आरोपी क्र. १ कडुन घेतलेला त्याचे स्नेहमोबाईल शॉपीमध्ये ठेवला आहे असे निवेदन दिले. त्याप्रमाणे चोरीस गेलेला मोबाईल जप्त केला. साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तपासाअंती आरोपीविरुध्द भा.दं.सं. चे कलम ३८० व ४११ कलमान्वये दोषारोपपत्र दाखल केले.

०४. आरोपी क्र. २ यावर वॉरंट व प्रोक्लमेशन काढले असता तो मिळुन आला नाही.त्यामुळे आरोपी क्र. १ ची स्वतंत्र संपरीक्षा घेण्यात आली. निशाणी ११ वर आरोपीविरुध्द भा.दं.सं. कलम ३८० अन्वये दोषारोप निश्चित केला. आरोपीस तो मराठीत वाचून व समजावून सांगितला असता त्यांनी तो नाकबूल करुन संपरिक्षेची मागणी केली.

०५. आरोपी क्र. १ विरुध्द पुरावा न आल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१) (ब) प्रमाणे आरोपीचा जबाब नोंदविला नाही.

०६. माझे विचारार्थ उपस्थित झालेले मुद्दे आणि त्यावरील माझे निष्कर्ष हे पुढीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | आरोपी क्र.१ ने फिर्यादी नामे संदीप जगन्नाथ थोरात याच्या दुकानातुन मोबाईलची चोरी केल्याचे, अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | --- | नाही. |
| २. | आदेश काय ? | --- | आरोपींची निर्दोष मुक्तता केली. |

## <u>का र ण मि मां सा</u>

०७. अभियोग पक्षातर्फे फिर्यादी संदीप जगन्नाथ थोरात (अ.सा.१) (निशाणी १७) याची साक्ष नोंदविण्यात आली.

**मुद्दा क्र. १ बाबत :-**

०८. फिर्यादीने त्याच्या पुराव्यात असे कथन केले की, सन २०१३ मध्ये त्याच्या दुकानातुन सॅमसंग कंपनीचा मोबाईल चोरीस गेला होता. त्याने कराड शहर पोलीस ठाणेत अज्ञात इसमाविरुध्द फिर्याद (नि. १८) दिली होती. फिर्यादीने त्याच्यात व आरोपीच्यात तडजोड झाल्याचे कथन केले आहे. तसेच, आरोपीविरुध्द त्याची तक्रार नसलेचे कथन केले आहे. आरोपीने फिर्यादीच्या मोबाईलची चोरी केली हे दर्शविणारा कोणताही पुरावा अभिलेखावर नाही. फिर्यादी व आरोपी यांच्यात तडजोड झाल्याची पुरशीस (नि. १३) कडे दाखल केली आहे. सबब मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष मी नकारार्थी नोंदविला आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ बाबत</u> :-**

९. आरोपी क्र. १ याचेवरील आरोप सिध्द होवू न शकल्याने सबळ पुराव्या अभावी

आरोपी हा निर्दोष मुक्त होणेस पात्र आहे. जप्त केलेला सॅमसंग कंपनीचा मोबाईल आरोपी क्र. २ याचे संपरिक्षेसाठी राखुन ठेवणे आवश्यक आहे. मुद्दा क्र. २ च्या उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. आरोपी क्र. १ याची भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३८० या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात आली.

२. आरोपीचा जातमुचलका व जामीनकदबा रद्द करण्यात आला. त्यांना मुक्त करण्यात आले.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ (अ) प्रमाणे रक्कम रुपये ५,०००/– चे बंधपत्र व तितक्याच रकमेचा जामीन द्यावा.

कराड.
दिनांक :– २१/०९/२०१८.

(अ. जि. पाटील .)
न्यायदंडाधिकारी वर्ग–१ कराड.
(कोर्ट नं.६)